SHETH T.J. EDUCATION SOCIETY'S
SHETH N.K.T.THANAWALA COLLEGE OF COMMERCE &
SHETH J.T.THANAWALA COLLEGE OF ARTS, THANE.

Date : 10th September, 2020

NOTICE

POST MATRIC SCHOLARSHIP SCHEME FOR MINORITIES 2020-21
(Government of India – Ministry of Minority Affairs)

Students belonging to six notified minority communities viz. Muslim, Christian, Sikh, Buddhist, Jain, Parsi (Zoroastrian) studying in India and fulfilling the Scheme guidelines are eligible to apply for **Post Matric Scholarship Scheme for Minorities 2020-21.** The Post Matric Scholarship Scheme is online Scheme and one can apply for fresh or renewal Scholarship under this Scheme on the National Scholarship Portal (NSP) at **https://scholarships.gov.in**. Link to the Portal is also provided on the website of the Ministry of Minority Affairs, i.e. **www.minorityaffairs.gov.in**. The last date for applying online is **31/10/2020.** Under any circumstances, offline forms will not be accepted. The sanctioned amount of scholarship (Course/tuition fee and maintenance allowance) will be directly transferred by the Central Government to Aadhar linked Bank Account (Under DBT Mode) of the student.

Eligibility & Conditions :

1) Applicant must be a resident/domicile of Maharashtra.
2) Scholarship will be awarded to the students who have secured not less than 50% marks or equivalent grade in the previous final examination.
3) The annual income of parents/guardians from all sources does not exceed Rs.2.00 lakh.
4) A student shall be eligible for only one scholarship out of all the available Scholarships of Central/State Government meant for SC/ST/OBC/ minority.
5) The continuance of award (for Renewal applicants) will be subject to securing 50% marks in the previous year's examination (provided the students pursues the same course and same Institute/School).
6) Scholarship will not be given to more than two students from a family.
7) If a student is found to have obtained a scholarship by false statement, his/her scholarship will be cancelled forthwith and the amount of the scholarship paid will be recovered from the student.
8) Students should be regular in attendance for which the yardstick will be decided by the competent authority of the college.

Essential documents required :

1) Student Photo
2) Institute Verification Form
3) Residential/Domicile Certificate
4) An Income Certificate, issued from a Competent Authority in the State/UT Governments is required in respect of parent/guardian of the student.
5) A Self-Certified Community Certificate is required from the student who has attained 18 years of age. For others the Community Certificate certified by parent/guardian of the student is required.
6) Attested Mark Sheet, indicating that the applicant has secured not less than 50% marks in the last qualifying exam at higher secondary/ graduation level.
7) Fee Receipt of 'Current Course Year'.
8) Xerox copy of Adhar linked Bank Account number of the Student along with the IFSC Code of the bank branch
9) Aadhaar number of the student and if Aadhaar is not available then bonafide student certificate from the school/institute and scanned copies of bank passbook and Aadhaar enrolment ID (if applied for Aadhaar).
10) Attested copy of Ration Card & Leaving Certificate

Procedure for Applying (Fresh and Renewal) :

1) The scheme is implemented through the National Scholarship Portal (NSP). It is mandatory for all students to apply online on the website i.e. www.scholarships.gov.in.
2) Before applying online; the students are asked to go through the detailed instructions for filling in online application and 'Frequently Asked Questions (FAQ)' on the National Scholarship Portal Homepage.
3) The Applicant can contact college office for resolving the problem while filling the online form.
4) The scholarship, once awarded, may be renewed during the next academic year of the course on the production of certificate that the student has secured 50% marks in the previous year's examination (provided the students pursues the same course and same Institute/School).
5) After filling the online form, the applicant is required to take a print out of the online form and submit it in the college office for further process with the relevant necessary documents as mentioned above **on or before 31/10/2020.**
6) In case of any technical issue; the applicant can immediately register your complain through the link https://scholarships.gov.in/fresh/complaintspage or accessing Complaints -> Register Complaints on the home page of the NSP website or call on the Helpline number 0120-6619540 or send mail on e-mail id: helpdesk@nsp.gov.in.

PRINCIPAL

शेठ टी.जे. एज्युकेशन सोसायटीचे

शेठ एन्.के.टी.टी. वाणिज्य महाविद्यालय व शेठ जे.टी.टी. कला महाविद्यालय, ठाणे.

दिनांक : १० सप्टेंबर, २०२०

सूचना

केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठीची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना

विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की **केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठीची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना सन २०२०-२१** नुसार **मुस्लिम, खिश्चन, शीख, बौध्द, जैन, बौध्द, शीख, पारसी, मुस्लिम व खिश्चन** या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्याकरिता ही योजना राबविण्यात येते. यासाठी विद्यार्थ्यांचे नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नुतनीकरण (Renewal) करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांनी **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावरुन ऑनलाईन (Online) पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे. **कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन (Offline) अर्ज स्विकारले जाणार नाहीत,** याची नोंद घ्यावी. विद्यार्थ्यास मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम (Course/tuition fee and maintenance allowance) केंद्र शासनामार्फत थेट विद्यार्थ्याच्या आधार लिंक बँक खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येईल.

किमान पात्रता व अटी :

१) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२) विद्यार्थी मागील वार्षिक परीक्षेत किमान ५०% गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा
३) अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. २.०० लाख पर्यंत असावे.
४) अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा/स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.
५) नूतनीकरणासाठी विद्यार्थ्यास मागील वार्षिक परीक्षेत ५०% गुण असणे आवश्यक आहे तसेच विद्यार्थी त्याच महाविद्यालयात व त्याच अभ्यासक्रमास शिकत असणे आवश्यक आहे.
६) एका कुटूंबातील फक्त दोन अपत्यांनाच सदर योजनेचा लाभ घेता येईल.
७) एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटींचे उल्लंघन करुन शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल / वसूल केली जाईल.
८) विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील उपस्थिती नियमित असणे आवश्यक आहे.

अर्जासोबतची आवश्यक कागदपत्रे :

१. विद्यार्थ्याचा फोटो
२. मागील वर्षाची गुणपत्रिकेची प्रत. (Self Attested)
३. महाविद्यालयाने पडताळणी केल्याबाबतचे प्रपत्र (Institution Verification Form)
४. पालकाचे राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिका-याकडील वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.
५. अल्पसंख्यांक समुदायाबाबतचे स्वतः प्रमाणित केलेले स्वयंघोषित प्रमाणपत्र. १८ वर्षाखालील विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या पालकांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र.
६. महाविद्यालयास चालु वर्षाची फी भरल्याची पावती / रिसीप्ट.
७. बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत. विद्यार्थ्याला मंजुर होणारी शिष्यवृत्तीची रक्कम ही त्याच्या बँक खात्यावरच जमा करण्यात येणार आहे.
८. रहिवासी प्रमाणपत्र.(Residential/Domicile certificate)
९. आधार कार्ड छायांकित प्रत. तथापि एखाद्या विद्यार्थ्याकडे आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी त्या विद्यार्थ्याने आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत किंवा पॅन कार्ड अथवा ड्रायव्हींग लायसन्सची प्रत अथवा प्राचार्यांची सही व शिक्का असलेले विद्यार्थ्याच्या ओळखीबाबतचे फोटोसह असलेले प्रमाणपत्र यापैकी एका कागदपत्राची छायांकित प्रत जोडावी.
१०. रेशन कार्ड, शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला (Attested copy of Ration Card & Leaving Certificate)

अर्ज करण्याची पद्धत (नविन मंजुरी/नुतनीकरण) :

(१) अल्पसंख्यांक पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी **www.scholarships.gov.in** या संकेतस्थळावरुन ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

(२) ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या homepage वरील Guidelines व Frequently Asked Questions (FAQs) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

(३) ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालयाशी संपर्क साधुन सदर अर्ज महाविद्यालयाच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा. सदर शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी आपला अर्ज ऑनलाईन सिस्टीममध्ये येणे अनिवार्य आहे.

(४) विद्यार्थ्यांने ज्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला आहे त्या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षी शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यन्त विद्यार्थ्यांने नुतनीकरणासाठीच अर्ज भरावा.

(५) ऑनलाईन अर्ज भरुन होताच विद्यार्थ्यांनी त्याची प्रिंट घ्यावी व त्यासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडून आपल्या महाविद्यालयामध्ये पुढील कार्यवाहीसाठी **३१/१०/२०२० पर्यंत नवीन शिष्यवृत्ती करिता (Fresh) व नुतनीकरण शिष्यवृत्तीकरिता (Renewal)** सादर करावीत.

टीप : विद्यार्थ्यांना उपरोक्त फॉर्म भरण्याबाबत कोणत्याही प्रकारची अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत श्री. डी.एन्. पवार यांच्याशी संपर्क साधावा.

प्राचार्य